दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.१० एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## शिवसेनेचे किरीट सोमय्या यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन

### सोमय्याच्या प्रतिमेला काळे फासून निषेध



**दै.रायगड नगरी । पेण**

आयएनएस विक्रांत या नावाने अंदाजे ५७ कोटी रुपये गोळा करून घोटाळा करणाऱ्या भाजपच्या किरीट सोमय्या विरोधात पेण तालुका शिवसेनेने जोडे मारो आंदोलन करीत त्यांच्या प्रतिमेला काळे फासले व जाहीर निषेध केला. त्याच प्रमाणे घोटाळेबाज किरीट सोमय्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

किरीट सोमय्या यांनीआयएनएस विक्रांतच्या नावाखाली अंदाजे ५७ कोटींचा निधी गोळा करून तो पैसा हडपला. हा निधी राज्यपालांकडे सुपूर्द करणे अपेक्षित होते मात्र, ही रक्कम तिथे जमा केली गेली नाही अशी माहिती माहिती अधिकारात प्राप्त झाली आहे. या वेळी उपजिल्हा प्रमुख अविनाश म्हात्रे, विधानसभा प्रमुख बाळा म्हात्रे, तालुकाप्रमुख तुषार मानकवळे, शहर प्रमुख सुधाकर म्हात्रे, माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक, महिला आघाडीच्या दीपश्री पोटफोडे, महिला नेत्या कल्पना पाटील, राजश्री घरत, वाहतूक सेनेचे दिलीप पाटील, अच्युत पाटील, प्रशांत पाटील, नरेश सोनावणे, राजा पाटील, तुकाराम म्हात्रे, नरेश शिंदे, लवेंद्र मोकल, गजानन मोकल, संजय पानसे, प्रसाद देशमुख, राजाराम पाटील, युवा सेनेचे चेतन मोकल, धीरज पाटील, हर्षद पाटील, अशोक वर्तक, आशिष वर्तक, नंदू मोकल यांच्यासह युवासेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना तालुकाप्रमुख तुषार मानकवळे, उप जिल्हाप्रमुख अविनाश म्हात्रे, यांनी आपल्या भाषणातून किरीट सोमय्यायांचा निषेध व्यक्त करीत सांगितले कि, संपूर्ण भारतीय बनावटीची युद्धनौका आयएनएसविक्रांत कालबाह्य ठरल्यानंतर ती वाचण्यासाठी सोमय्या यांनी देशप्रेमाची हाक देऊन मोठ्या प्रमाणात निधी संकलित केला होता.

…/२

# गुणरत्न सदावर्तेंना ११ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

उच्च न्यायालयाने गुरुवारी संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना २२ एप्रिलपर्यंत कामावर हजर होण्याचे आदेश दिल्यानंतर संप मिटल्याचे चित्र निर्माण झाले असताना, शुक्रवारी दुपारी १०० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या एका जत्थ्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या 'सिल्व्हर ओक' या बंगल्यावर हल्ला केला. याप्रकरणी पोलिसांनी कामगारांचे वकील गुणरत्न सदावर्तेंना अटक केली आहे. त्यानंतर, न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी दोन्ही पक्षांनी बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर किला न्यायालयाने गुणरत्न सदावर्ते यांचा जामीन अर्ज फेटाळत दोन दिवसांची म्हणजेच ११ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तर या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या अन्य १०९ जणांना न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.



किला न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर सदर निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती कैलास सावंत यांनी निकाल दिला आहे. प्रथमदर्शनी पोलीस तपासात आरोपींविरोधात सक्षम पुरावे असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. तसेच सदावर्ते यांचा जामीन अर्ज फेटाळताना वरील न्यायालयात जामिनासाठी अर्ज करण्याची मुभा न्यायालयाने दिली आहे.

एसटी कामगारांच्या आंदोलनामागे दुसरा व्यक्ती आहे. काही व्यक्तींच्या चिथावणी खोर वक्तव्यांमुळे आंदोलन केले जाणार होते. शरद पवार, अजित पवार आणि अनिल परब यांच्या बाबतीत वारंवार वक्तव्य केली जात होती. रॉयल स्टोन येथेदेखील आंदोलन होणार होते. कामगारांच्या कालच्या हिंसक आंदोलनाचे सीसीटीव्ही फुटेज घटना स्थळाचे जप्त केले आहेत.

यामागे काही लोकांचा हात असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. न्यायालयात सरकारी वकिल प्रदीप घरत यांनी राज्य सरकारची बाजू मांडली. तसेच सदावर्ते यांच्या जामीन अर्जावर आक्षेप नोंदवण्यात आला.

## राष्ट्रवादी परिवार संवाद दौऱ्यानिमित्त ११ एप्रिलला जलसंपदा मंत्री जयंत पाटील पनवेल, उरणमध्ये



**दै.रायगड नगरी । पनवेल/उरण**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील हे ११ एप्रिल रोजी पन-वेल, उरणमध्ये येणार आहेत. ११ एप्रिल रोजी सकाळी साडे दहा ते साडे अकरा पर्यंत उरण विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक घेणार आहेत. तर दुपारी दीड वाजता ते पनवेलला येणार आहेत. त्यावेळी पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकारणीची आढावा बैठक त्यानंतर साडे तीन पनवेल विधानसभा मतदारसंघ आढावा बैठक घेणार आहेत. सायंकाळी साडेचार वाजता कामोठे येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करून ते कर्जतकडे जाणार आहेत.

राज्याचे जलसंपदा मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या दि.११ एप्रिल २०२२ रोजीच्या राष्ट्रवादी परिवार संवाद दौऱ्या निमित्त प्रदेश सरचिटणीस व नवीमुंबई राष्ट्रवादी काँग्रेसचे निरीक्षक प्रशांत पाटील, महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर,उरण विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष भार्गव पाटील,तालुकाध्यक्ष मनोज भगत, शहर अध्यक्ष गणेश नलावडे, तालुका महिला अध्यक्ष हेमांगी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत काल सकाळी ११ वाजता आनंदी हॉटेल, कोटनाका उरण येथे पत्रकार परिषद घेण्यात आली.

यावेळी प्रशांत पाटील यांनी पत्रकार परिषद घेण्यापाठीमागची भूमिका स्पष्ट केली. यावेळी ते म्हणाले की उरण तालुक्यात अनेक समस्या आहेत. अनेक प्रश्न आहेत ते समजून घेण्यासाठी व त्या समस्या सोडविण्यासाठी तसेच पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधण्यासाठी व त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी उरण

…/२

## अंबा नदीपात्रात विषारी औषध टाकून मासेमारी ; नदीपात्रात हजारो मासे मृत

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील महत्वाची समजली जाणारी अंबा नदी व या नदीच्या पाण्यावर जगणारे सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा गावातील याच अंबा नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर मृत मासे आढळून आल्याने जांभुळपाडा ग्रांमस्थांमध्ये घबराट पसरली आहे.हे मासे नक्की कोणत्या कारणाने मेले आहेत. त्यावर उलट सुलट चर्चा लोंकांमध्ये सुरु झाले आहे.

कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अंबानदी पात्रात विषारी औषध टाकून मासे मारण्याचा प्रकार केला. असल्याची चर्चा सध्या लोकांमध्ये ऐकायला मिळत आहे. या अगोरी प्रकारामुळे अंबा नदी पात्रा-तील जांभुळपाडा येथे मृत मासे आढळून आल्याने नागरीकांमध्ये खळबळ उडाली आहे. या अंबानदीच्या पात्रात ठराविक



कालावधीनंतर नेहमीच अशा प्रकिरे मृत मासे नदीत आढळून येत असल्यामुळे येत असल्यामुळे सर्वाच्याच भुवया उंचावल्या आहेत.

तसेच नदीतील पाणी ही दुषित होत आहे. याच आंबा नदीपात्रातील अनेक गावातील लोक पाणी पियत असल्यामुळे लोकांनमध्ये भीतीचे वातावरण आहे. जांभुळपाडा आंबा नदीपात्रात अशा प्रकारे नदीपात्रात औषध टाकुन मासे मारणाऱ्यांवर कडक शासन व्हावे अशी मागणी ग्रांमस्थांकडुन होत आहे.

### संक्षिप्त...

## प्रवीण दरेकर मुंबई पोलिसांची पुन्हा नोटीस

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांना मुंबई पोलिसांनी दुसऱ्यांदा नोटीस पाठवली आहे. माता रमाबाई आंबेडकर पोलिस स्टेशनमध्ये हजर राहण्याची सूचना दरेकर यांना नोटीसीतून दिली गेली आहे. ११ एप्रिल रोजी पुन्हा एकदा पोलिस स्टेशनमध्ये चौकशीसाठी हजर राहा, असे आदेश नोटीसीमधून देण्यात आले आहेत. मुंबै बँक बनावट मजूर प्रकरणात ही नोटीस दिली गेली आहे.

आठवड्याभरापूर्वी प्रवीण दरेकर यांची माता रमाबाई आंबेडकर नगर पोलिस स्टेशनमध्ये मुंबै बँक बनावट मजूर प्रकरणात चौकशी झाली होती. जवळपास चार ते पाच तास पोलिसांनी प्रवीण दरेकर यांची चौकशी केली होती. त्यावेळी गरज लागल्यास पुन्हा बोलविण्यात येईल, असं पोलिसांनी दरेकरांना सांगितलं होतं. दरेकरांनीही पोलिसांचं म्हणणं मान्य केलं होतं. आता ११ तारखेला पोलिसांच्या नोटीसीनुसार दरेकरांना पुन्हा चौकशीसाठी जावं लागणार आहे.

मुंबै बँक बोगस मजूर प्रकरणात प्रवीण दरेकर यांची ४ एप्रि रोजी मुंबईतील रमाबाई आंबेडकर पोलीस स्टेशनमध्ये सुमारे चार तास चौकशी करण्यात आली होती. यादरम्यान त्यांना विविध प्रश्न विचारले गेले. चौकशी संपल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी चौकशीदरम्यान पोलिसांनी नियबाह्य प्रश्न विचारल्याचा आरोप केला तसंच सरकारचा पोलिस अधिकाऱ्यांवर दबाव असल्याचंही ते म्हणाले होते.

## भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाचा वार्षिक पदवी वितरण समारंभ




**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाचा वार्षिक पदवी वितरण समारंभ शनिवारी (दि. ०९) आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ विधीज्ञ तथा ॲडव्होकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे अध्यक्ष संजीव कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ झाला. या वेळी उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी देऊन गौरविण्यात आले.

या समारंभाला पनवेल विधीज्ञ संघाचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे नगरसेवक

…/२

## शरद पवार यांच्या निवासस्थानवर दगडफेक केल्या प्रकरणी कर्जत तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । कर्जत**


राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्वर ओक निवासस्थानावर शुक्रवारी एसटी कर्मचाऱ्यांनी उग्र आंदोलन केली, यावेळी एसटी कामगारांकडून पवार यांच्या घरावर चप्पल आणि दगडफेक करण्यात आली. या घटनेचा निषेध म्हणून कर्जत तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे कर्जत पोलिस ठाण्यांमध्ये निवेदन देऊन समाजकंटक माथेफिरूवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुरेश लाड, ज्येष्ठ नेते तानाजी चव्हाण, महिला आघाडी तालुकाध्यक्ष रंजना धुळे, माजी तालुकाध्यक्ष अशोक भोपतराव, सागर शेळके, नगरसेवक शरद लाड, सोमनाथ ठोंबरे, राम कोळंबे, रणजीत जैन, राजेश लाड, बिलाल आढाळ, सोमनाथ पालकर, जगदीश ठाकरे, अनंत निलधे, तेजस राणे, अरुण काळोखे, सुहास वांजळे, महेंद्र चंदन, मल्हारी माने, अमोल देशमुख, जयवंत म्हसे, योगेश गंगावणे, रमाकांत कडू, आदी सह शेकडो कार्यकर्त्यांनी कर्जत पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांची भेट घेतली व त्यांना निवेदन दिले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार

…/२




## ॲड.मनोज भुजबळ यांचे वाढदिवसानिमित्त मोफत कायदेशीर सल्ला सप्ताह उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल, नवी मुंबई परिसरातील नामांकित वकील, भाजपा ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पनवेल महानगरपालिकेतील कर्तव्यदक्ष नगरसेवक, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष, अखिल भारतीय अधिवक्ता परिषद, पनवेल तालुकाध्यक्ष ॲड.मनोज भुजबळ यांचा १० एप्रिलचा वाढदिवस हा विविध उपक्रमांचे आयोजनाने उत्साहात साजरा होणार आहे.

ॲड.मनोज भुजबळ हे पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष या नात्याने सदैव वकीलांचे पाठीशी उभे असतात. कोरोनासारख्या कठीण काळात त्यांनी कार्यकर्ते, त्यांच्याकडे समस्या घेवून येणारे तसेच

…/२

# विजेचा सालाबादी खेळखंडोबा

एकीकडे उन्हाची काहिली वाढत असताना, विजेचा तुटवडा महाराष्ट्राचे प्राण कंठाशी आणत आहे. शहरांमध्ये वीज गेल्याने जितका गोंधळ उडतो, त्याहीपेक्षा अधिक गोंधळ ग्रामीण भागात होतो. याचे कारण, वीज नसली की पिकांना पाणी देणे कठीण होऊन बसते. सध्याचे वाढते तापमान पाहता, पिकांना आणि फळबागांना वेळेवर पाणी न मिळणे, म्हणजे पिके हातातून जाण्यासारखेच असते. 'महाराष्ट्र आता भारनियमनमुक्त' होणार, अशा गप्पा वारंवार मारल्या गेल्या आहेत. किती लाख कृषिपंपांना वीजजोडणी दिली, याचीही आकडेवारी दिली जाते. प्रत्यक्षात महाराष्ट्रात गेली काही वर्षे वीजपुरवठा सातत्याने अनियमित होतो आहे. याआधीही, इतर राज्यांकडून किंवा खासगी कंपन्यांकडून महागडी वीज घेण्याची वेळ आली होती. तशीच वेळ यंदाही येणार होतीच. आता राज्य सरकारने महावितरणला बाजारातून वीज विकत घेण्याची अनुमती दिली आहे. ही परवानगी १५ जूनपर्यंत असेल. तोपर्यंत तापमान घटेल, पाऊस पडेल आणि राज्याची विजेची मागणी काहीशी कमी होईल, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक वीजवापर करणारे राज्य आहे. नागरीकरणाबरोबरच महाराष्ट्रातील उद्योगांची संख्या हेही महत्त्वाचे कारण आहे. वीज कपातीचा झटका महाराष्ट्रातील उद्योगांना बसला, तर करोनोत्तर काळात बसू लागलेली आर्थिक घडी पुन्हा विस्कटू शकते. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने नव्या वीज प्रकल्पांना जो विरोध होतो आहे, त्यामागच्या उथळ राजकारणाकडे या निमित्ताने लक्ष वेधावे लागेल. महाराष्ट्राची वाढती वीजमागणी पुरी करण्याची क्षमता जलविद्युत प्रकल्पांमध्ये नाही; त्यामुळे अणू, औष्णिक किंवा सौर ऊर्जा हे महत्त्वाचे पर्याय राहतात. आज कोळशावर निर्माण होणाऱ्या विजेवर आपण अधिकाधिक अवलंबून राहत आहोत. हा कोळसा आयात करावा लागतो. मागेही महाराष्ट्रातील काही प्रकल्पांमध्ये केवळ काही दिवसांचा कोळसा उरला आहे, अशी स्थिती आली होती. तशीच स्थिती आत्ताही होते आहे. दूरदृष्टीने नवनवे ऊर्जाप्रकल्प उभारणे, हा त्यावरचा उपाय असतो. महाराष्ट्राचे राजकीय नेतृत्व आणि गेल्या दोन दशकांमधील सगळी सरकारे यात अपयशी ठरली आहेत. महाराष्ट्रात विजेचे दर अगदी माफक प्रमाणात कमी केल्याची बातमी आली होती. तिचे नावीन्य संपण्याच्या आतच, येत्या दोन महिन्यांत मोठी वीज दरवाढ होऊ शकते, असे अंदाज व्यक्त होत आहेत. महागाईने आधीच त्रस्त झालेल्या नागरिकांच्या डोक्यावर वीज दरवाढीचीही कुऱ्हाड पडणार असे दिसते. महाराष्ट्रात विजेच्या तीन स्वतंत्र कंपन्या झाल्या असल्याने, वितरण कंपनीला महाग वीज घ्यावी लागली, तर तो बोजा ग्राहकांच्याच डोक्यावर बसणार. बाहेरच्या राज्यांमधून वीज घेणे किंवा ऐन वेळी अतिरिक्त कोळशाची तरतूद करणे, या नेहमीपेक्षा खर्चिक बाबी असतात. ही वेळही वीजमागणीचे आणि वीज निर्मितीचे यथायोग्य नियोजन न केल्यामुळेच येते. सध्याच महिन्याला दोनशे युनिट वीज वापरणारी कुटुंबे एका युनिटला साडेसात रुपये मोजत आहेत. तो दर पुढे जवळपास साडेतेरा रुपये प्रतियुनिट इतका चढत जातो. हे भाव कमी नाहीत. खरे तर, दोनशे युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना याहून थोडी स्वस्त वीज मिळायला हवी; मात्र तसे होत नाही. एकीकडे विजेवरच्या गाड्यांना प्रोत्साहन द्यायचे आणि दुसरीकडे, परीक्षांच्या व ऐन उन्हाळ्याच्या काळात वीजकपात करायची, यातील विसंगतीच राज्यकर्त्यांना समजू नये, ही दुर्दैवाची बाब आहे. शिकणाऱ्या मुलांना, बांधावरच्या शेतकऱ्यांना, रुग्णालयांना आणि उद्योगांना प्राधान्याने पुरेसा वीजपुरवठा करायला हवा, ही नैतिक जबाबदारीच अलीकडे पाळली जात नाही. महाराष्ट्राच्या अर्धनागरी किंवा ग्रामीण भागांचा कानोसा घेतला, तर छोट्या व मध्यम रुग्णालयांची अपुऱ्या व अनियमित वीजपुरवठ्यामुळे किती दैना होते, याची कल्पना येईल. छोटी रुग्णालये वीज निर्मितीची पर्यायी व्यवस्था करू शकत नाहीत. तशी ती करणे, म्हणजे उपचारांचा खर्च वाढणेही असते. अनेकदा वीज नसल्याने शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागतात. विजेच्या सर्वोच्च मागणीचा अंदाज घेऊन पावले टाकली नाहीत, की असे होते. ही स्थिती यंदाचीच नाही. गेल्या वर्षी अनेक गावा-शहरांमध्ये अस्वस्थ नागरिकांनी शेवटी मध्यरात्री जाऊन वीज मंडळाच्या कार्यालयात ठाण मांडले होते. मग वर्षभरात सरकारने काय केले? पवन व सौर ऊर्जेच्या गप्पाच जास्त मारल्या जातात. आता 'महाजनको' आणि 'एनटीपीसी' हे महाराष्ट्रात अडीच हजार मेगावॉट क्षमतेच्या सौर प्रकल्पासाठी संयुक्त कंपनी स्थापणार आहेत. या निर्णयालाही मोठा विलंब झाला आहे. गेल्या वर्षी नापीक व अकृषी जमिनीवर शेतकऱ्यांनी सौर प्रकल्प उभारावेत म्हणून योजना आली. तिचे पुढे काय झाले? बीड जिल्ह्यातल्या सौर प्रकल्पानंतर आणखी किती मोठे प्रकल्प कार्यान्वित झाले? या साऱ्या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधली, तरच पुढच्या वर्षी परिस्थिती बदलेल.

# महावितरणच्या इमर्जन्सी शॉकने ग्राहक हैराण श्रीवर्धन, म्हसळ्यात भारनियमन, व्यावसायिकांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

उन्हाळ्यात जिल्ह्यातील म्हसळा व श्रीवर्धन तालुक्यात तापमानाच्या पाऱ्याने विक्रमी आकडा गाठला आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमान ३५- ४० अंश सेल्सिअसच्या खाली आलेले नाही. उलट गेल्या आठवड्यात तापमानाने पुन्हा चाळीशी पार केली. अशा स्थितीत अंगाची लाहिली होत असताना ग्रामीण भागात सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार अधिक वाढले आहेत.

दरवर्षी उन्हाळ्यात विजेची मागणी आणि पुरवठा यात तफावत होत असल्याने भारनियमन होत असते. वारंवार आणि अधिक वेळपर्यंत वीजपुरवठा खंडित राहत असल्याने भारनियमन' की अघोषित भारनियमन' याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे. तीव्र तापमानाने उकाडा वाढला आहे. अशावेळी पंखे, कुलर, एसीसाठी विजेची नितांत गरज असतांना आपत्कालीन लोडशेडींग सुरु करण्यात आल्याने नागरीक अक्षरश: कासावीस झाले आहेत. दिवसा अंग भाजून काढणारे तप्त सुर्यकिरणे तसेच रात्री उशीरापर्यंत उन्हाळी झळा लागत असल्याने नागरिकांचे विशेषत: लहान मुले, रुग्ण आणि वयोवृद्ध यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहे. कडक उन्हाळा आणि सणासुदीच्या काळात अचानक भारनियमन सुरु करण्यात आल्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून भारनियमन बंद करण्याची मागणी केली जात आहे. उन्हामुळे शहरातील सर्वच रस्ते आणि बाजारपेठेत शुकशुकाट पसरू लागला आहे. कडक ऊन बाहेर पडू देत नसल्यामुळे सर्वच जण घरात थांबत असून त्यांच्यासाठी पंखे, कुलर, एसी यांचाच आधार आहे मात्र अचानक आपत्कालीन भारनियमन सुरु करण्यात आल्यामुळे सर्वांचीच तारांबळ उडाली आहे. सध्या मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु असल्यामुळे मुस्लीम बांधव-भगिनी रोजे धरत आहे. लोडशेडींगमुळे त्यांना देखील त्रास सहन करावा लागत आहे. बुधवारी दहा तास लाईट ना आल्याने रात्री ग्रामस्थांनी थेट गोंडघर सुबस्टेशन गाठले व भारनियमन बाबत जाब विचारला त्यानंतर आमदार अनिकेत तटकरे तसेच दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांनी माध्यमातून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

केंद्रात व राज्यात सत्ता परिवर्तन झाले. मात्र वीजपुरवठा हा भारनियमनमुक्त करता आलं नाही. दरवर्षी उन्हाळा येतो आणि भारनियमन केले जाते. कडक उन्हाळा आणि सणासुदीच्या काळात अचानक भारनियमन सुरु करण्यात आल्यामुळे नागरीकांसह व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. श्रीवर्धन च्या महावितरण चे उपविभागीय कार्यालयाचे उपअभियंता वाघपैंजन यांची बदली होऊन पाच महिने झाले तरी आद्यपही नवीन अधिकारी दिला गेला नाही. सध्या शंभर किलोमीटर पेण येथील कार्यालयातील रविकिरण पाटील यांच्या कडे अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे मात्र त्यांची श्रीवर्धन ला अनुपस्थिती असते त्यामुळे श्रीवर्धन उपविभाग सध्या वाऱ्यावरच आहे.

## आरसिफ प्रकल्पबाधित मच्छीमार बांधवांना न्याय मिळणार?

# आ.रमेश पाटील यांनी केंद्रीय रसायन व खत मंत्री ना.भगवंत खुबा यांची दिल्ली येथे भेट

**दै.रायगड नगरी । तळा**




रायगड जिल्ह्यातील थळ व नवगाव येथील राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि. कंपनीच्या प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या मच्छीमार बांधवांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या व समस्यांबाबत कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भारतीय जनता पार्टीचे विधानपरिषदेचे आमदार रमेशदादा पाटील यांनी केंद्रीय रसायन व खत मंत्री ना. भगवंत खुबा यांची दिल्ली येथे भेट घेतली.

गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि. कंपनीच्या मरिन आउट फॉल पाईप लाईनमुळे रायगड जिल्ह्यातील थळ नव-गाव येथील स्थानिक मच्छीमार बांधवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे तेथील स्थानिक प्रकल्पग्रस्त मच्छिमार बांधव मदत मिळण्यासाठी संघर्ष करीत आहेत.

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लि. कंपनीकडून मच्छीमार बांधवांना जेटी, रस्ते, दिवाबत्ती व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील असे आश्वासन दिले होते परंतु आज पर्यंत त्यांनी या आश्वासनांची पूर्तता केलेली नसल्यामुळे मच्छीमार बांधव आजही या सुविधांपासून वंचित आहेत. त्यामुळे या प्रकल्पग्रस्त बाधित मच्छीमार बांधवांना न्याय देण्याची व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार रमेशदादा पाटील यांनी केंद्रीय रसायन व खत मंत्री ना. भगवंत खुबा यांच्याकडे केली. यावर मा. मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना आरसीएफच्या दि. २२/०१/२०१६ च्या पत्राचा खुलासा करण्यास सांगून पुढील महिन्यात महाराष्ट्रात आल्यानंतर यासंदर्भात बैठक आयोजित करून हा प्रश्न सोडवला जाईल असे सांगितले असल्याची माहिती आमदार रमेशदादा पाटील यांनी दिली.

# वसंतराव नाईक आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले महाविद्यालय म्हसळा येथे माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



म्हसळा येथील कोकण उन्नती मित्र मंडळाच्या वसंतराव नाईक कला,वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालयाच्या १९९०-९१ पासूनच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा शनिवार दि.०९ एप्रिल,२०२२ रोजी माजी विद्यार्थी मेळावा महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला होता.

१९९२-९३ पासून महाविद्यालयातून बी.ए, बी.कॉम. झालेल्या आणि विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी तसेच २०१८-१९ पासून बी.एससी, एम.कॉम. झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थी मेळाव्यास वेळात वेळ काढून आवर्जून उपस्थित राहिले होते. महाविद्यालयातील स्थानिक विकास समिती सदस्य महादेव पाटील, प्राभारी प्रा.टेकळे, प्रा.दुंडे, प्र.प्रा.जाधव यांनी देखील या कार्यक्रमा निमित्त आपल्या नजरेखालून गेलेल्या विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमात उपस्थित राहिलेल्या माजी विद्यार्थ्यांपैकी योजना करडे, अनिता देशपांडे, रुपेश मेंदाडकर, अर्चना येलवे, चंद्रकांत पवार, जयसिंग बेटकर, निकेश कोकचा या सर्व माजी विद्यार्थ्यांनी मनोगतामध्ये आपल्या कॉलेज जीवनातील विविध आठवणींना उजाळा दिला आणि कार्यक्रमाला आवर्जून बोलवल्या बद्दल आभार देखील मानले.

सदर कार्यक्रमाकरिता बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित राहिले होते. महाविद्यालय विकास समितीचे विश्वस्त सचिव प्रतिनिधी फजल हळदे, सदस्य महादेव पाटील, सदस्या श्रीम. निलम वेटकोळी,प्रभारी प्राचार्य प्रा.दिगंबर टेकळे, माजी प्रभारी. प्राचार्य एम.एस.जाधव, माजी विद्यार्थी संघटना समन्वयक अध्यक्ष के.एस.भोसले तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्या मार्फत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक प्रा.भोसले यांनी केले तर आलेल्या सर्व माजी विद्यार्थी यांचे आभार एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा.बेंद्रे यांनी मानले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शिवसेनेचे किरीट सोमय्या यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन

यासाठी रेल्वे स्थानके, विमानतळां वरून रक्कम जमा केली. नागरिकांनीही देशप्रेमापोटी सढळ हस्ते मदत केली. आयएनएस विक्रांतवाचविण्याच्या मोहिमेत किती रक्कम जमा झाली, या रकमेचा विनियोग कसा करण्यात आला हे आज पर्यंत सोमय्या यांनी उघड केले नाही. ही रक्कम जमा करत असताना आयएनएस विक्रांतचे भव्य युद्धनौकेत रूपांतर करून सदर निधी राजभवनात जमा करणार असल्याचे त्यावेळी सांगितले होते. मात्र किरीट सोमय्या यांनी हा निधी राजभवनावर जमाच केला नाही. तसेच राजभवनावर कुठल्याही प्रकारचा धनादेश अथवा रक्कम जमा करण्यात आली नाही. म्हणून कोट्यावधींचा घोटाळा करणाऱ्या किरीट सोमय्याचा निषेध शिवसेनेच्या वतीने करण्यात येत आहे.

## राष्ट्रवादी परिवार संवाद दौऱ्यानिमित्त ११ एप्रिलला जलसंपदा मंत्री जयंत पाटील पनवेल, उरणमध्ये

तालुक्यामध्ये राष्ट्रवादी परिवार संवाद या कार्यक्रमा अंतर्गत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री जयंत पाटील हे दि. ११एप्रिल २०२२ रोजी उरण मध्ये येणार असल्याची माहिती प्रशांत पाटील यांनी दिली.

या राष्ट्रवादी परिवार संवाद कार्यक्रमा अंतर्गत खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूबभाई शेख, आ. अनिकेत तटकरे, रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश लाड, महिला जिल्हाध्यक्ष उमाताई मुंढे, युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणा सलगर, युवक जिल्हाध्यक्ष अंकित साखरे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे आदी पदाधिकारीहि या दौऱ्या निमित्त उरण मध्ये येणार आहेत. कार्यकर्ते पदाधिकारी यांच्याशी संपर्क करून जनतेच्या, नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्या हेतूने या राष्ट्रवादी परिवार संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रशांत पाटील यांनी यावेळी दिली.

## भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाचा वार्षिक पदवी वितरण समारंभ

ॲड. मनोज भुजबळ, जनार्दन भगत शिक्षण प्रसरक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, उपमहापौर सीताताई पाटील, कार्यकारी मंडळ सदस्य तथा महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, सदस्य तथा नगरसेवक अनिल भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शितला गावंड, सीकेटी महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्यासह पदाधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर ज्येष्ठ विधीज्ञ तथा ॲडव्होकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे अध्यक्ष संजीव कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, तुम्ही जे वकिलीचे ज्ञान घेतले आहे ते तुम्ही आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात गेला तरी कधीच वाया जाणार नाही तसेच वकिलाला कधी बोलले पाहिजे, कधी उभे राहिले पाहिजे आणि कधी शांत बसले पाहिजे याचे ज्ञान असणे आवश्यक आहे, असा मोलाचा सल्ला देऊन त्यांनी पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात म्हटले की, फक्त पैसा कमवणे हे आपले ध्येय्य नसले पाहिजे. पैशाने माणूस मोठा होत नाही, तर बुद्धीने आणि समाजातील आपल्या वागणुकीने मोठा होतो. रायगड जिल्ह्यात एक नामवंत महाविद्यालय म्हणून भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाचे नाव मोठे होत आहे. त्यामुळे येथे तुम्ही शिकला याचा तुम्हाला नक्की गर्व वाटेल. ॲड. मनोज भुजबळ यांनी विद्यार्थ्यांना भावी कालावधीत कशा रितीने पुढे जावे या संदर्भात मार्गदर्शन केले.

## कर्जत तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडून जाहीर निषेध

यांच्या मुंबई येथील सिल्वर ओक निवासस्थानी काही समाजकंटक माथेफिरुंनी दगडफेक केली, मा.न्यायालयाचा निर्णय आल्यावर काही एसटी कर्मचाऱ्यांनी पेढे वाटून व गुलाल उधळून आनंद व्यक्त केला असताना काल दगडफेक करण्याचे कारण काय आज पर्यंत नेत्यांच्या घरावर अशा प्रकारे कृत्य पुरोगामी महाराष्ट्रात कधीच घडलेले नाही. महाराष्ट्र लोकनेते असलेल्या शरद पवार यांच्या घरावर अशाप्रकारे दगडफेक होणे हे अत्यंत निंदनीय कृत्य असून त्याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो पोलिसांनी या दगडफेकी मागील करते करवते कोण आहेत याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## ॲड.मनोज भुजबळ यांचे वाढदिवसानिमित्त मोफत कायदेशीर सल्ला सप्ताह उपक्रम

ज्युनि./सहकारी वकीलांना व्यक्तीगतरित्या आणि पनवेल वकील संघटनेचे माध्यमातून सर्वातोपरी मदत केलेली आहे. ॲड.मनोज भुजबळ हे समाजसेवेत, राजकीय क्षेत्रात असल्याने त्यांच्याकडे नेहमीच अन्याय, अत्याचार झालेले व्यक्ती येत असतात. तसेच त्यांचे कार्यकर्ते हे वेगवेगळ्या समस्या घेवून येत असतात. त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम ॲड.मनोज भुजबळ यांचेकडून अवितरपणे सुरू आहे. ॲड.मनोज भुजबळ यांनी समाजकारणाचे, समाजसेवेचे अविरत व्रत घेतलेले असून त्यांनी अल्पावधीत पनवेल परिसरातील जनतेच्या मनात स्थान निर्माण केलेले आहे. आपल्या कार्याचा ठसा ॲड.मनोज भुजबळ यांनी ठळकपणे समाजात, पनवेल परिसरात उमटविलेला आहे. त्यामुळे ॲड.मनोज भुजबळ यांचे कार्याने प्रेरित हावून त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत कायदेशीर सल्ला सप्ताह या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांना अनोख्या शुभेच्छा देण्याचा ॲड.किशोर धाकड पनवेल यांचा मानस आहे. तरी दि.१० एप्रिल ते १६ एप्रिल या कालावधीत ॲड.किशोर धाकड, पनवेल हे मोफत कायदेशीर सल्ला सप्ताह हा उपक्रम राबविणार असून ज्या कोणावरही समाजातील कोणत्याही घटकाकडून, वर्गाकडून अन्याय, अत्याचार, फसवणूक झाली असेल त्यांनी ॲड.किशोर धाकड पनवेल कार्यालय शॉप नं.३२, शिवा कॉम्प्लेक्स, पोलीस चौकीजवळ, भूखंड नं.६, से.१९, नवीन पनवेल, मो.नं.९८६७०५१३३० यांचेकडे बिनधास्त संपर्क साधून संधीचा लाभ घ्यावा.

## अपघातात स्कुटी चालकाचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई गोवा महामार्गावर नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाकणनाका जवळील गोडसई येथील गुरुनानक ढाब्या जवळ स्कुटीला झालेल्या अपघातात स्कुटी चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.८ रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

यासंदर्भात नागोठणे पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार सुनिल परशुराम मरवडे (वय-३७ वर्षे) रा. तळवली, ता.रोहा हे आपल्या होंडा कंपनीच्या ॲक्टिव्हा स्कुटीने मुंबई बाजूकडून कोलाड बाजूकडे जात असताना वाकण जवळील मौजे गोडसई येथील गुरुनानक ढाब्या जवळ आले असता त्यांनी त्यांचे स्कुटीवरील नियंत्रण गेल्याने स्कुटी रस्त्याच्या उजव्या बाजूला घसरल्याने झालेल्या अपघातात सुनिल यांस गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. अतुल जाधव हे अधिक तपास करीत आहेत.

## गालबोट न लावता आगामी सण, जयंती व पालखी सोहळा उत्सव साजरा करा : तानाजी नारनवर

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये आगामी काळात श्रीराम नवमी, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्री हनुमान जयंती तसेच श्री पळसाई माता पालखी सोहळा, श्री आक्कादेवी माता पालखी सोहळा, नागोठणे गावची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता पालखी सोहळा या निमित्ताने साजरे करण्यात येणाऱ्या उत्सव तसेच पालखी सोहळा कोणत्याही प्रकारचे वादविवाद न करता रितसर परवानगी घेऊन शासनाच्या अटी शर्तीचे पालन करत नियमांनुसार सर्व कार्यक्रम शांततेत पार पाडत पालखी सोहळा व उत्सव भक्तिमय वातावरणात सोहळ्यास गालबोट लागणार नाही याची काळजी घेत उत्साहात साजरा करण्यात यावा अशी सुचना नागोठणे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी केली. आगामी येणारे सण उत्सव साजरे करण्यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यात शुक्रवार दि. ८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वा. आयोजित शांतता समितीच्या बैठकीत नारनवर बोलत होते. यावेळी भाई टके, विलास चौलकर, हिरामण कोकाटे, मारुती शिर्के, ज्ञानेश्वर शिर्के, सुनिल लाड, ज्ञानेश्वर सांळुखे, राजेश पिंपळे, नितीन राऊत, विक्रांत घासे,गणपत डाकी, योगेश ठाकूर, मंगेश कामथे, रुपेश नागोठणेकर, प्रथमेश काळे, दिनेश घाग, प्रमोद नागोठणेकर, पो.ह. विनोद पाटील यांच्यासह पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहीर निविदा

**फूलमाळी समाज, पोदी-पनवेल**

**संत सावतामाळी सभागृह, रेल्वे स्टेशन रोड, तक्का- पनवेल**

फूलमाळी समाज पोदी-पनवेल च्या संत सावता माळी सभागृहाचे रिपेअरिंगचे काम जसे की, फ्लोरिंग, प्लास्टर, पेंटींग तसेच इतर रिपेअरिंगची कामे करावयाची आहेत. सदर रिपेअरिंगच्या कामाबाबतचा अधिक तपशिल फुलमाळी समाज, संत सावतामाळी सभागृहाच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल.

तरी इच्छुक ठेकेदाराने आपल्या निविदा दिनांक १८/०४/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत सिलबंद स्वरुपात पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी सायंकाळी ४.०० वाजता उपस्थित निविदा धारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

आलेल्या निविदा स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाने राखुन ठेवला आहे.

सही/-
**सुधीर सदाशिव कांडपिळे**
**चिफ ट्रस्टी**
**फूलमाळी समाज, पोदी-पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## म्हसळा तालुक्यात कातकरी उत्थान अंतर्गत आदिवासींना विविध दाखल्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर (भा. प्र. से.)यांच्या मार्गदर्शनाखाली मेंदडीकोंड येथे तहसील कार्यालय तहसीलदार समिर घारे यांच्या कल्पनेतून आयोजित कातकरी उत्थान कार्यक्रम मेंदडी येथे संपन्न झाला.

या प्रसंगी मंडळ अधिकारी रवींद्र उभारे,तलाठी गजानन गिरी, त्या त्या विभागातील तलाठी, सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, कोतवाल,गाव अध्यक्ष, आदिवासी लाभार्थी आदि मान्यवर उपस्थित होते.खामगांव परिसरातील एकूण ७७ कुटुंबातील आदिवासी बांधवानी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. यामध्ये २६ कुटुंबाना जातीचे दाखले, ६२ कुटुंबांना उत्पन्न दाखले, ८६ कुटुंबांना वय अधिवास दाखले, ३० कुटुंबांना आधार कार्ड वाटप तर ५ कुटुंबांना शिधापत्रिका वाटप करण्यात आले. या प्रसंगी बोलताना तहसीलदार समिर घारे यांनी सांगितले कि तालुक्यातील अनेक भाग अत्यंत दुर्मिळ आणि डोंगराळ भाग असून या भागातील आदिवासी बांधवाना तालुक्याच्या ठिकाणी जाणे म्हणजे खूप खर्चिक आणि लांबचे आहे. कधीकधी संबंधित अधिकारी काही कामास्तव कार्यालयात उपलब्ध नसल्याने लाभार्थ्यांना खूप त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे लाभार्थ्यांना कसल्याही प्रकारचा त्रास अगर आर्थिक बोजा पडू नये यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे तहसीलदार समिर घारे यांनी सांगितले.



## शेतकरी वर्गाला कडबाकुट्टी मशिनची भेट

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड रोहा यांची सेवाभावी संस्था श्री विवेकानंद रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिटट्यूट रोहा रायगड या संस्थेच्या वतीने खांब-देवकान्हे विभागातील पशूपालन करणाऱ्या शेतकरी वर्गाला कडबाकुट्टी मशिनची भेट देण्यात आली आहे.

एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड रोहा यांची सेवाभावी संस्था श्री विवेकानंद रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिटट्यूट रोहा रायगड संस्था नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रात सहकार्य व मार्गदर्शन करत असते तर शेती व शेतकरी वर्गाच्या हिताचे द्रुष्टीने नेहमीच विविधांगी उपक्रम राबवून शेतकरी वर्गाला प्रोत्साहित केले जात आहे. तर मागील काही महिन्यांपूर्वी हिरवा चारा उत्पादन घेण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून बियाणे दिले होते त्याची लागवड करून हिरवा चारा चांगल्या प्रकारे उगवला आहे व उत्पादन सुरू झाले आहे त्यासाठी विवेकानंद रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिटट्यूट व शेतकरी यांच्या एकत्रित सहभागातून कडबाकुट्टी यंत्र मशीन घेण्यात आली आहे.दुग्ध व्यवसाय वाढावा याा उद्ददेशाने संस्थेचे वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शेतकरी वर्गाने स्वागत करून धन्यवाद दिले आहेत.

# दिविल ते हावरे रस्त्याचे सुरू झालेले काम निकृष्ट दर्जाचे



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मागील रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप आराखड्यामध्ये नवीन लोहारे जि.प.गटाला सवाद भाग जोडण्यात आला असून गेल्या अनेक वर्षांपासून राजेवाडीफाट्यामार्गे महाड तालुक्याशी संपर्कात असलेले येथील पोलादपूरवासिय दिवीलमार्गे पोलादपूर या तालुक्याच्या शहराशी संपर्कात यावेत, यासाठी ग्रामस्थ गेल्या काही वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करीत होते. सहा वर्षांपूर्वी या ग्रामस्थांनी तत्कालीन केंद्रीय अवजड उद्योगमंत्री ना.अनंत गीते यांची भेट घेऊन साकडे घातले असता लोहारे ते तुर्भे पुलाच्या उद्घाटनप्रसंगी ना.गीते यांनी सवाद-हावरे ते दिवील रस्ता आपणच करण्याची घोषणा केली होती. आता पुन्हा रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका नजिकच्या काळात होणार असताना दिवील ते हावरे रस्त्याचे काम पूर्ण झाले मात्र या कामाचा दर्जा अतिशय सुमार असल्याने सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे डेप्युटी इंजिनियर व्ही.आर.बागूल अडचणीत येण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

पोलादपूरवासिय दिवीलमार्गे पोलादपूर या तालुक्याच्या शहराशी संपर्कात यावेत,यासाठी स्व.गणपत जंगम गुरूजींनी हयातभर पाठपुरावा केला तर स्थानिक सामाजिक कार्यकर्ते अब्दुलहक खलफे यांनी सातत्याने पत्रव्यवहार व अभियंत्यांच्या भेटी घेऊन आग्रह धरला आणि स्व.जंगम गुरूजींच्या पश्चात दोन अडीच वर्षांपासून सवाद आणि हावरे येथील ग्रामस्थ पाठपुरावा करीत आहे. पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत रायगड जिल्हा परिषदेच्या अख्त्यारीतील या रस्त्यावर २०१४ मध्ये दिवील बाजूने काही अंतरापर्यंत खडीकरण करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर हे काम रखडल्यामुळे गेल्यावर्षी या ग्रामस्थांनी केंद्रीय अवजड उद्योगमंत्री ना.अनंत गीते यांची भेट घेऊन साकडे घातले. यानंतर लोहारे ते तुर्भे पुलाच्या उद्घाटनप्रसंगी ना.गीते यांनी हा रस्ता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी आपणच पूर्णत्वास नेण्याची घोषणा केली.

गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये अनंत गीते यांचा पराभव होऊनही हे दिवील ते हावरे रस्त्याचे काम पूर्ण करण्याची जबाबदारी काही राजकीय व्यक्तींनी घेतली. मात्र, ठेकेदारांकडून रस्त्याच्या दर्जाबाबत जबाबदारपणा दाखविण्यात हे स्थानिक राजकीय पुढारी कमी पडले असून हा सुमार दर्जाचा रस्ता केल्याने पोलादपूर बाजूच्या जनतेला 'तळे राखील तो पाणी चाखील' असे वाटत असले तरी सप्तक्रोशीतील जनतेला मात्र या रस्त्याने पोलादपूर तालुक्याचे ठिकाण जवळ येऊनही रस्ता अडीच महिन्यांनी पावसाळ्यामध्ये अतिवृष्टी झाल्यास धुवून जाण्याची शक्यता असल्याचे दिसून आल्याने नाराजी पसरली आहे.

सवाद सप्तक्रोशीतील महाड तालुक्यातील राजेवाडी ते भोर रस्त्यावरील भोराव फाट्यापासून आत असलेल्या धारवली, माटवण, सवाद, कणगुले, कालवली, वावे, हावरे या गावांना भोराव फाटा ते महाड हे अंतर केवळ १० कि.मी. आणि हावरे ते पोलादपूरपर्यंत २१ कि.मी.असल्याने महाड शहराशी संपर्क ठेवणे सहज आणि पोलादपूर या तालुक्याच्या गावाकडे येण्यासाठी द्राविडी प्राणायाम घालावा लागत असल्याचा अनुभव गेल्या अनेक वर्षांपासून हा परिसर देवळे जि.प.गटामध्ये असूनही कायम राहिला. गेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीआधी पोलादपूर ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाल्याने देवळे जि.प.गटातील सवाद गावाचा नव्याने तयार झालेल्या लोहारे ५९ जि.प.गटामध्ये समावेश करण्यात आला असून सप्तक्रोशीतील उर्वरित गांवे पूर्वीप्रमाणेच देवळे जि.प.गटामध्ये असल्याने दिवील ते हावरे रस्त्याच्या कामाचा दर्जा सप्तक्रोशीतील गांवे आणि ग्रामस्थांची पोलादपूर तालुक्याच्या शहराशी संपर्क राहण्यासाठी नियमानुसार असण्याची गरज व्यक्त होत आहे.

पोलादपूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे डेप्युटी इंजिनियर व्ही.आर.बागूल यांना या कामाच्या दर्जाची आणि पूर्ततेची कोणतीही खबर नसल्याने कनिष्ठ अभियंत्यांकडून कोणतीही कामे परस्पर केली जात आहेत काय, असा प्रश्न सप्तक्रोशीतील जनतेला पडला आहे.

# श्री जोगेश्वरी माता देवस्थान उत्सव समिती जाहीर : अध्यक्षपदी नितिन राऊत तर उपाध्यक्षपदी रुपेश नागोठणेकर

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रोहा तालुक्यातील नागोठणे गावचे आराध्य ग्रामदैवत व जागृत देवस्थान श्री . जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त मंडळाकडून ग्रामदेवतांच्या विविध उत्सवांसाठी स्थापन करण्यात आलेल्या उत्सव समितीची मुदत संपल्यानंतर सन २०२२ ते सन २०२५ या तीन वर्षांसाठी नवीन उत्सव समितीची स्थापना करण्यासाठी एक महत्वपूर्ण बैठक

नुकतीच श्री जोगेश्वरी माता मंदिरात आयोजित करण्यात आली होती. यावेळी या बैठकीत श्री जोगेश्वरी मातेचे खडकआळी येथील सेवेकरी नितीन राऊत यांची श्री जोगेश्वरी माता देवस्थान उत्सव समितीच्या अध्यक्षपदी तर कुंभारआळी येथील रुपेश नागोठणेकर यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. याचबरोबर सचिवपदी आंगरआळी येथील मंगेश कामथे, सहसचिवपदी संजय नांगरे, खजिनदार प्रथमेश काळे, सहखजिनदार सुदर्शन कोटकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी या बैठकीला श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र जैन, सचिव भाई टके, हरिष काळे, माजी सरपंच विलास चौलकर, विद्यमान उपसरपंच मोहन नागोठणेकर, सुनिल लाड, उत्सव समितीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब टके, माजी उपाध्यक्ष विनायक गोळे, अनिल नागोठणेकर, रविंद्र राऊत, राजेश पिंपळे, प्रकाश मोरे, पांडुरंग कामथे, राजा गुरव, चेतन कामथे, मंदार चितळे, सुदर्शन कोटकर, किरण लाड यांच्यासह नागोठणेकर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित अध्यक्ष नितीन राऊत यांच्यासह उपाध्यक्ष रुपेश नागोठणेकर व पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले तर मागील तीन वर्षात विविध कार्यक्रम उत्सव समितीचे अतिशय उत्तमरीत्या पार पाडल्याने माजी अध्यक्ष बाळासाहेब टके यांच्यासह त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा देखील पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला.

दरम्यान मागील दोन वर्षात कोरोना महामारीच्या काळात पालखी उत्सवांवर शासनाने बंदी घातल्याने चैत्र महिन्यात होणारा श्री जोगेश्वरी मातेचा पालखी सोहळ्यावर विरजण पडले असताना मात्र या वर्षी मोठ्या उत्साहात अतिशय भक्तिमय वातावरणात कोणताही अनुचित प्रकार घडणार याची दक्षता घेऊन रविवार दि.१७ एप्रिलला होणारा पालखी सोहळा सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्य तसेच नागोठणेकर ग्रामस्थ यांच्या मदतीने व सहकार्याने अतिशय उत्तमरीत्या पार पाडला जाईल अशी ग्वाही यावेळी नितीन राऊत यांनी दिली.

# नक्षत्र 2022 विद्यार्थ्यांच्या कला गुणाचे उत्कृष्ट व्यासपीठ : डॉ. डी आर सुरोशे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सरस्वती इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी खारघर मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन नक्षत्र २०२२ चे आयोजन करण्यात आले होते.

जोगवा या कला नृत्यास प्रथम पारितोषिक देण्यात आले. क्रिकेटमध्ये तृतीय वर्ष सिव्हील हा संघ प्रथम विजेता ठरला.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये झालेल्या सामन्यांमध्ये शिक्षकेतर कर्मचारी अकाउंट सेक्शन हा संघ प्रथम विजेता ठरला. विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यासाठी प्रमुख प्रमुख पाहुणे म्हणून खारघर पोलीस स्टेशनचे धीरज पाटील तसेच खारघर पत्रकार संघाचे संस्थापक, सचिव, सा. सार्थ लोकनिती संपादक संतोष वाव्हळ व माझं साम्राज्य न्युज आणि परिणीता सोशल फाऊंडेशनच्या संचालिका साक्षी सागवेकर मॅडम उपस्थित होत्या.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही अ) गणू सजण्या कातकरी मयत तर्फे वारस १) देहू गणू कातकरी २) सदू गणू कातकरी तर्फे मयत वारस, राजेश सदू कातकरी, सुरेखा सदू वाघमारे, ३) सजन गणू कातकरी मयत तर्फे वारस पोशी सजन कातकरी, रवि सजन कातकरी, पोशी सजन कातकरी, भारती सजन कातकरी ४) बेबी सुदाम हिलम ५) सुंदर काशिनाथ कातकरी मयत तर्फे वारस दिलीप काशिनाथ कातकरी, संजय काशिनाथ कातकरी, शबी तात्या कातकरी, जिजा संतोष वाघे ब) गंग्या नाग्या कातकरी मयत तर्फे वारस सिताराम गंग्या कातकरी मयत तर्फे नामदेव सिताराम कातकरी, फशी तुकाराम कातकरी २) श्रावण गंग्या कातकरी ३) भूरी बुधाजी कातकरी मयत तर्फे वारस महादेव बुधाजी कातकरी, दत्ता बुधाजी कातकरी मयत तर्फे वारस चांगुणा दत्ता कातकरी, चंद्र राजेश कातकरी, पांडुरंग बुधाजी कातकरी मयत तर्फे वारस नथुराम पांडुरंग कातकरी, ज्ञानेश्वर पांडुरंग कातकरी, ज्ञानेश्वर पांडुरंग कातकरी, निवृत्ती पांडुरंग कातकरी, रंजना पांडुरंग कातकरी, अनंत बुधाजी कातकरी, शकुंतला बुधाजी कातकरी ४) किसन गंग्या कातकरी मयत तर्फे वारस भगवान किसन कातकरी, मयत तर्फे वारस काळी भगवान कातकरी, राहू भगवान कातकरी, बामा किसन कातकरी मयत तर्फे वारस बारकी बामा कातकरी, भाऊ बामा कातकरी, जयश्री राहूल मुकणे, नीता बामा कातकरी क) धर्मा तुक्या कातकरी मयत तर्फे वारस १) कानू धर्मा कातकरी मयत तर्फे वारस, दिलीप कानू कातकरी, जयश्री संजय वाघमारे, आकाश कानू कातकरी, अजय कानू कातकरी २) शेण्या धर्मा कातकरी मयत तर्फे वारस अनुसया शेण्या कातकरी, मोहन शेण्या कातकरी, गणेश शेण्या कातकरी, हिराबाई बाळाराम कातकरी ३) राम धर्मा कातकरी मयत तर्फे वारस यमुना राम कातकरी, सुशिला राम कातकरी, निलम राम कातकरी, सुरज राम कातकरी ४) ज्योती बबन नाईक मयत तर्फे वारस दिलीप बबन नाईक, अंजना नरेश वाघमारे, गंगाराम बबन वाघमारे, ५) मारुती धर्मा कातकरी ६) दशरथ धर्मा कातकरी ड) नथू चिमा कातकरी मयत तर्फे वारस १) राजू नथू कातकरी, २) गुणा दत्तात्रय कातकरी ३) यमुना राम नाईक इ) शिवग्या नवश्या कातकरी मयत तर्फे वारस १) मनोहर शिमग्या कातकरी २) कमळी राम वाघमारे ३) सुमन नामदेव मोरे मयत तर्फे वारस संजय नामदेव मोरे, रोहित नामदेव मोरे, ज्योती नामदेव मोरे ई) माधु विठ्या कातकरी मयत तर्फे वारस १) गोटीराम महादू कातकरी मयत तर्फे वारस भरत गोटीराम कातकरी, सुरेश गोटीराम कातकरी, राम गोटीराम कातकरी मयत तर्फे वारस शुभांगी राम कातकरी, करण राम कातकरी, ज्ञानेश्वर राम कातकरी २) देवकी दामू कातकरी ३) भूरी कुशा कातकरी ४) मैना पांडुरंग कातकरी प) लहान्या सख्या कातकरी मयत तर्फे वारस १) मारुती लहान्या कातकरी २) नारायण लहान्या कातकरी ३) भिमा तात्या वाघे, ४) राधा नकुल कातकरी ५) तारा रामदास वाघमारे फ) महादू अर्जून कातकरी व बुधी महादू कातकरी हे दोघे मयत तर्फे वारस १) आत्माराम महादू मोरे उर्फ कातकरी, २) राधा बबन कातकरी, ३) मीरा राम कातकरी यांच्या मालकी हक्काची व वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीचे विक्रीबाबत त्यांचे व आमच्या अशिलांच्या दरम्यान विक्री व्यवहार ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याबाबत खात्री व भरोसा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर अन्य त्यापैकी कोणत्याही भागावर कोणाचा काही विक्री करार, बक्षिस वाटणी, अदलाबदल, भाडेकरार, गहाण, दान, दावा, लीज, लीन, कर्ज पोटगी, वारसा, वहिवाट, ॲक्वीझिशन, रिक्वीझिशन अगर अन्य कोणत्याही प्रकारे, हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून व कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी व स्वतःची लेखी हरकत आमचेकडे नोंदवावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत समजून सदर मिळकतीचा हस्तांतराचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सबब ही जाहीर नोटीस दिली असे.

**परिशिष्ट**

**तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका पनवेल व तसेच जिल्हा परिषदेच्या आणि मे.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे अधिकार क्षेत्रातील गाव मौजे भेरले, ता.पनवेल, जि.रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्डनुसार शेतजमीन मिळकत आहे. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भेरले, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे/गट क्र. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| १५६ | २/अ/२९ | २३-६९-८० | ०० |

येणेप्रमाणे जमीन मिळकत असे व तिचेशी ॲटॅच्ड हक्क, अधिकार व हितसंबंधहीत दरोबस्त. कळावे. ही जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक : ०९/०४/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.निवृत्ती बी.पावशे**
**शॉप नं.४९, बिल्डींग नं.३, पहिला मजला, पनवेल महानगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**


### शरद पवार यांचे घरावर भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ

# म्हसळा राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचा मुकमोर्चा काढून केला निषेध



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिनांक ९ एप्रिल २०२२ रोजी मुंबईत एसटी संपकरी कर्मचाऱ्यांनी संप मिटला असताना मा.न्यायालयाचे आदेश पायदळी तुडवत आपल्यावर अन्याय झाला आहे याला फक्त आणि फक्त राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पक्षाचे अध्यक्ष,राष्ट्रीय नेते खासदार शरदचंद्रजी पवार आणि त्यांचा परिवारच जबाबदार आहे असे गृहीत धरून कोणाच्यातरी सांगण्यावरून अचानकपणे शरदचंद्रजी पवार यांच्या मुंबई येथील सिल्वरओक निवासस्थानी जाऊन संपकरी एसटी कर्मचारी यांनी त्यांचे घरासमोर निदर्शने करून भ्याड हल्ला केला. केलेला हल्ला पूर्वनियोजित आसुन निव्वळ षडयंत्र होते.

एसटी संपकऱ्यांनी केलेले कृत्य अशोभनीय आहे या कृत्याचे म्हसळा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि तालुका लोकप्रतिनिधी यांनी म्हसळा ग्रामिण रुग्णालय ते तहसीलदार कार्यालयापर्यंत मुकमोर्चा काढुन जाहीर निषेध केला आहे.या हल्ल्यामागे व हल्ला घडवून आणले त्या अज्ञात लोकांचा,शक्तीचा हात आसुन त्यांना व हल्ला करणाऱ्यांना शोधून शासनाने त्यांचेवर कठोरात कठोर कारवाई करावी अशी म्हसळा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे वतीने मोर्चाद्वारे मा.जिल्हाधिकारी रायगड यांना म्हसळा तहसीलदार समीर घारे यांचे मार्फत निवेदन देवुन जाहीर मागणी केली आहे. तालुका अध्यक्ष समीर बनकर यांचे नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या मोर्चात माजी सभापती छाया म्हात्रे, माजी उपसभापती संदिप चाचले, माजी सभापती महादेव पाटील, पं.स.सदस्य मधुकर गायकर, जेष्ठ नेते अंकुश खडस, रियाजभाई फकीह, गजानन पाखड, गजानन जंगम, प्रकाश गाणेकर, महिला अध्यक्षा रेश्मा काणसे, शहर अध्यक्षा शगुप्ता जहांगीर, गटनेते संजय कर्णिक, भाई बोरकर, सतीश शिगवण, नदीम दळवी, नगरसेवक संजय दिवेकर, सरोज म्हशीलकर, कासीम मेमन, अनिल टिंगरे, नईम दळवी, मंगेश म्हशीलकर आदि मान्यवर उपस्थित होते.

# पालिकेच्या ऑनलाईन मॅरेज रजिस्ट्रेशन पोर्टलला उत्स्फुर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील नागरिकांना दि.१ एप्रिल पासून ऑनलाईन पध्दतीने विवाह नोंदणी करता येणार आहे. यासाठी महापालिकेच्यावतीने 'मॅरेज रजिस्ट्रेशन पोर्टल' सुरु करण्यात आले आहे. या पोर्टलला अर्जदारांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभत आहे.

यापूर्वीच्या प्रक्रियेत अर्जदाराला किमान पाच ते सहा खेटे या विवाह नोंदणीच्या प्रक्रियेसाठी मारावे लागत होते.मात्र पालिकेने राबविलेल्या या ऑनलाईन प्रक्रियेमुळे केवळ एकदाच विवाह नोंदणीसाठी अर्जदार तसेच त्यांच्या साक्षीदारांसह उपस्थित रहावे लागणार आहे. चार प्रभागात केलेल्या नोंदणीत पनवेल ३५, कामोठे १३, कळंबोली ९,खारघर ९ आदींचा समावेश आहे. 'मॅरेज रजिस्ट्रेशन पोर्टल'वर जाऊन इच्छुक नागरिकांनी http://pmc.marriagepermission.com आपली सर्व माहीती भरावयाची आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून या माहीतीची छाननी केली जाईल. दर सोमवारी आणि गुरुवारी १०-१२ यावेळेत या नोंदणी इच्छुक नागरिकांना बोलण्यात येईल. दिलेल्या तारखेस येताना नागरिकांनी आपल्या मूळ कागदपत्रांचा छायांकीत प्रत असलेला एक सेट सोबत घेऊन यावे. त्याचवेळी त्यांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल. महापालिकेच्या मुख्यालय सोडून खारघर'अ',कळंबोली 'ब',कामोठे'क',पनवेल'ड' या प्रभाग कार्यालयात नागरिकांसाठी ही विशेष सुविधा देण्यात आली अशी माहिती पालिका उपायुक्त सचिन पवार यांनी दिली. नागरिकांना वारंवार विवाह नोंदणीसाठी पालिकेत खेटे मारावे लागु नये म्हणुन हे ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात आले असून नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभत असल्याचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, सदनिका क्रं.८०२, रेखी साई फ्लोरा को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट क्र.५९, सेक्टर ३५ ई, ओवे, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड या पत्यावर ७९२ चौरस फूटची सदनिका व कार पार्कींग क्र.३० ही श्री.रियास बेलुथा अब्दुल खादेर यांचे नावे दि.०१/०१/२०१० रोजी नोंदविलेल्या दस्तऐवज क्र.६१२ सह दुय्यम निबंधक, पनवेल-३ प्रमाणे नोंदणीकृत व स्थित आहेत.

सदर सदनिकेसंबंधी आमचे अशिलांनी मिळकतीचे मालक श्री.रियास बेलुथा अब्दुल खादेर यांच्याशी मिळकत विकत घेणे संबंधी अंतिम बोलणी केलेली आहे व श्री.रियास बेलुथा अब्दुल कादेर यांनी सदर सदनिका आमचे अशिलांना ठरलेल्या रकमेत सर्व प्रकारे दावेमुक्त, मागण्यांपासून मुक्त विकण्याचे मान्य केलेले आहे.

सदर सदनिका व त्याच्या कोणत्याही भाग संबंधाने तुम्ही कुणाही व्यक्तीस विक्री, बदली, असाईनमेंट, गहाणवट, अधिभार, शुल्क, नावे करणे, बक्षिस, न्यास, वारसा, व्यवसाय, ताबा, मालकी, भाडेपट्टी, पोट-भाडेपट्टी, लिव्ह ॲण्ड लायसेन्स, लीज, सबलीज, लीन, देखरेख, बीक्वेस्ट वारसा, फॅमिली असाईनमेंट, सेटलमेंट, कायदेशीर कारवाई, दिवाळखोरी व कोणत्याही न्यायालयाचा निकाली आदेश व अन्य कोणत्याही प्रकारे कसलाही भाग हक्क, दावा, लाभ, स्वारस्य, आक्षेप अथवा मागणी असल्यास त्यांनी तो कृपया लेखीस्वरुपात त्या पुष्ट्यर्थ मुळ कागद पत्रासह निम्न स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील पत्यावरील कार्यालयात ही नोटीस जारी झाल्यापासून ०७ दिवसांचे आत सकाळी १० ते सायं.५ पर्यंत दाखल करावेत अन्यथाा अशा व्यक्ती व व्यक्तीचे दावे, हक्क सोडून देण्यात आल्याचे आणि / अथवा दुर्लक्षित केल्याचे समजण्यात येईल व आमचे अशिल सदर सदनिके संदर्भात पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही तसेच माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

स्थळ : खारघर
दि.१०/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.जे.बी.शिकलगार**
**(खरेदीदाराचे वकील)**
**गाळा क्र.२, प्लॉट क्र.सी-२, ज्ञानसारथी सह.गृह.संस्था मर्या., सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई**
**संपर्क क्र.९३२३८६७६१४**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री.दिनेश गुरुनाथ कडव, २) श्री.स्वप्नील सुनील पाटील, ३) श्री.मंगेश कमलाकर भोपी यांनी १) श्री.स्वप्नील परशुराम डोलकर, २) श्रीमती.कल्पना हिराजी डोलकर, ३) श्री.विकी हिराजी डोलकर, ४) श्रीमती.शितल हिराजी डोलकर, ५) श्री.राकेश हिराजी डोलकर, ६) श्री.जैमिन चंदू पटेल यांच्या मालकीच्या मौजे : तरघर येथील घर मिळकत क्र.GP-242, GP-243, GP-244 ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता संपादीत झालेली आहे. सदर संपादीत मिळकतीच्यापोटी पुर्नवसन योजनेंतर्गत खालील भूखंड वितरीत करण्यात आलेला आहे. तो भूखंड आमचे अशिल विकसनास घेवू इच्छित आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भूखंडाचे वर्णन**

| भूखंड क्रमांक | सेक्टर नं. | नोड | तालुका व जिल्हा | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| २०६ बी | २५ ए | पुष्पक, वडघर | पनवेल, रायगड | ४२० |

वरील मिळालेला भूखंड आमचे अशिलांनी विकसनास घेण्याचे ठरवलेले आहे व तसा विकसनाचा करारनामा करून त्यांना आर्थिक मोबदला सुद्धा अदा केलेला व सदर करारनामा पूर्ण करण्याच्या दृष्टीने म्हणजेच सदर भूखंड आमच्या अशिलांच्या नावे सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराने तबदील करून घेणार आहेत. तरी सदर भूखंडाच्या अनुषंगाने सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, सवाठेकरार, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी, रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

पनवेल
दि.०९/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.विकास संतोष पाटील**
**बी.ए., एलएल.बी.,**
**शॉप नं.१२३, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८६७६०७९२०/९८२०६९७९२१**

# संक्षिप्त...

## बेकायदेशीर ताडी विक्री करणाऱ्यांवर पोलिसांची धाड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे हद्दीतील खांदा गाव येथील एका घरामध्ये बेकायदेशीर ताडीची साठवणूक करून ठेवली असल्याची माहिती कामोठे पोलिसांना मिळताच पोलीस पथकाने छापा टाकला यामध्ये ६० लिटर ताडी एका ड्रममध्ये भरलेले आढळले हि ताडी जप्त केली त्याचबरोबर दोघा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.रमेश सत्तया पाकाला, वय – (२५ वर्षे), अंजया रामास्वामी गोडीशेला, (वय – २९) वर्षे, राहणार – रामशेठ पाटील यांची चाळ, रूम नं. १, मोठा खांदा गाव, कामोठे असे अटक केलेल्यांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार कामोठे पोलिसांनी बेकायदेशीर मध्य, ताडी विक्री व पुरवठा करणाऱयांवर कारवाई करण्याची मोहीम सुरु केली आहे. यावेळी कामोठे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महाला यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली कि कामोठे हद्दीतील खांदा गावामधील खांदा गाव येथील रामशेठ पाटील यांच्या चाळीतील एका घरामध्ये बेकायदेशीर ताडीची साठवणूक करून ठेवली असल्याची माहिती मिळाली होती.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि महाला यांनी पोलीस नाईक सचिन ठोंबरे, पवार, ठाकुर, काळे या पथकांना याबाबत माहिती देत कारवाई करण्यासाठी धाडले, यावेळी त्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार घरामध्ये छापा टाकला यावेळी या छाप्यामध्ये २ पिवळया रंगाचे प्रत्येकी ३० लिटरचे ड्रम ताडीने भरलेले आढळून आले हि ताडी पोलिसांनी जप्त केली. त्याचबरोबर दोघाजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच हि जप्त केलेल्या ताडीचा नमुना तपासणीसाठी रासायनिक प्रयोगशाळा कलीना मुंबई येथे पाठविण्यात आला आहे. तसेच या दोघाजणांवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा कामोठे पोलीस ठाण्यात दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## स्वामित्व योजनेंतर्गत पनवेल तालुक्यात गावठाणांचे होणार ड्रोन सर्वेक्षण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गावठाण जमाबंदी प्रकल्प योजनेत भारतीय सर्वेक्षण विभाग (सर्वे ऑफ इंडिया) मार्फत ड्रोनद्वारे गावठाणातील मिळकतींचे सर्वेक्षण करुन GIS प्रणालीवर आधारीत मालमत्ता/मिळकत पत्रक तयार करण्याच्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. यानुसार पनवेल तालुक्यातील स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोन सर्वेक्षणाकरिता गावठाणातील मिळकतींना चुना मार्किंगच्या कामास १० एप्रिल २०२२ पासून सुरुवात करण्यात येणार असून ११ एप्रिल २०२२ पासून कर्नाळा या गावापासून ड्रोनद्वारे गावठाणाचे सर्वेक्षण सुरू केले जाणार आहे.

संनियंत्रण अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिलेल्या सूचनेद्वारे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी यांच्या मार्गदर्शनाखाली, तालुका संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी, पनवेल यांच्या अध्यक्षेखाली ८ एप्रिल २०२२ रोजी पंचायत समिती, पनवेल येथील सभागृहामध्ये गावठाणाचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याबाबत



आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीस जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी, पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, गटविकास अधिकारी संजय भोये, उपस्थित होते.

या योजनेचे लाभ पुढीलप्रमाणे : १. शासनाच्या मालकीच्या मिळकतींचे संरक्षण होईल. २. मिळकतींचा नकाशा तयार होईल व सीमा निश्चित होतील. ३. मिळकतींचे नेमक क्षेत्र माहित होईल. ४. मालकी हक्काचा अभिलेख मिळकत पत्रिका (Property card) तयार होईल. ५. ग्रामस्थांच्या नागरी हक्काचे संरक्षण होईल. ६. गावातील रस्ते शासनाच्या ग्रामपंचायतीच्या खुल्या जागा, नाले यांच्या सीमा निश्चित होतील. ७. मिळकत पत्रिका तयार झाल्यामुळे घरावर कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध होईल. ८. मिळकतींना बाजारपेठेमध्ये तरलता येऊन गावाची आर्थिक पत उंचावेल. ९. ग्रामपंचायतीला गावातील कर आकारणी, बांधकाम परवानगी यासाठी मिळकत पत्रिका होईल. १०. मिळकत पत्रिका https://digitalsatbara.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावरुन सहज उपलब्ध होतील.

पनवेल तालुक्यातील स्वामित्व योजनेंतर्गत ड्रोन सर्वेक्षणाकरिता गावठाणातील मिळकतींना चुना मार्किंग च्या कामास १० एप्रिल २०२२ पासून सुरुवात करण्यात येणार असून ११ एप्रिल २०२२ पासून कर्नाळा या गावापासून ड्रोनद्वारे गावठाणाचे सर्वेक्षण सुरू केले जाणार आहे.

हा प्रकल्प ग्रामस्थांसाठी शासनाचा राबविण्यात येणारा महत्वाकांक्षी प्रकल्प असून तो ग्रामस्थांच्या सक्रीय सहभागामुळेच यशस्वी होऊ शकणार आहे, तरी ग्रामस्थांनी ८–अ च्या नोंदी अदयावत करून घ्याव्यात, ग्रामस्थांनी आपल्या स्वतःच्या मिळकतींचे चुन्याच्या सहाय्याने अचूक सीमांकन करावे, ग्रामस्थांनी त्यांचे दूरध्वनी / मोबाईल नंबर व पत्ते ग्रामसेवक अथवा संबंधित पालक कर्मचारी यांना दयावी. ग्रामस्थांनी या मोहिमेसाठी ग्रामपंचायत व भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी आणि पनवेल उप अधीक्षक भूमी अभिलेख विजय भालेराव यांनी केले आहे.

## क्ले पेव्हर ब्लॉक उत्तम दर्जाचे नसल्याने रस्ते लवकरच येणार डबघाईला स्थानिकांमध्ये नाराजी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी माथेरानच्या विकास कामांसाठी २०१३ मध्ये जवळपास १२३ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर केल्यामुळे आज खऱ्या अर्थाने जी नेरळ ते माथेरान दरम्यान घाटरस्त्याची कामे, महत्वाच्या पॉईंट्स चे सुशोभीकरण त्याचप्रमाणे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी पासून ते महात्मा गांधी मार्गाचे शेवटचे टोक पांडे रोड पर्यंत क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची कामे एमएमआरडीए च्या माध्यमातून सुरू आहेत त्यामुळेच इथे विकासात्मक बदल दिसून येत आहे. धूळ विरहीत रस्ते बनविण्यासाठी क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते हाच एकमेव पर्याय उपलब्ध असल्याने ही कामे सुरू आहेत.



परंतु ही कामे पूर्ण करताना संबंधीत ठेकेदाराला एवढ्या मोठ्या प्रमाणावर ठेका दिलेला असताना त्यांच्याकडून वापरण्यात येत असलेले ब्लॉकस हे कमकुवत दिसत असून या मुख्य रस्त्यावर सतत घोडा, हातरीक्षा, मालवाहू हातगाड्याची रेलचेल असल्याने या रहदारीच्या रस्त्यावर जेमतेम दोन वर्षेच हे ब्लॉक्स तग धरू शकतात एवढीच क्षमता असल्याचे चित्र सध्यातरी स्पष्टपणे दिसत आहे असे नागरिकांमधून बोलले जात आहे. त्यामुळेच स्थानिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे हे लावण्यात आलेले कमकुवत ब्लॉक्स लपविण्यासाठी ठेकेदाराने त्यावर मोठया प्रमाणावर ग्रीट अंथरली होती.तर रस्त्याच्या बाजूला उभारलेल्या कठड्यावर पाणी टाकले जात नाही. रस्त्यावरील धुळीचे प्रमाण या ग्रीटमुळे वाढल्याने श्वसनाचे आजार बळावू लागले होते याकामी जागरूक नागरिकांनी आवाज उठविल्यानंतर काहीशा प्रमाणात ही ग्रीट काढण्याचा दिखावा करण्यात आला होता. रायगड जिल्ह्यातील माथेरान हे सर्वांचे आवडते पर्यटनस्थळ आहे. त्यामुळे इथे बाराही महिने पर्यटकांची गर्दी होत असते. धूळ विरहीत रस्त्याला पर्याय म्हणून हे ब्लॉक्स वापरण्यात येत आहेत परंतु त्याचा दर्जा उत्तम प्रकारे नसल्याने सततच्या रहदारीमुळे या ब्लॉक्सची माती होऊन पुन्हा एकदा नागरिकांसह पर्यटकांना धुळीचा सामना करावा लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

माथेरान मध्ये क वर्ग नगरपरिषदेच्या साठी या सुंदर पर्यटनस्थळासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी लवकर उपलब्ध होण्याची शक्यता नाही. माथेरानमध्ये क्ले पेव्हर ब्लॉक उत्तम दर्जाचे नसल्याने रस्ते लवकरच येणार डबघाईला येणार आहेत त्यामुळे संबंधीत ठेकेदाराकडून चांगल्या दर्जाचे ब्लॉक्स लावण्यात यावेत असेही स्थानिकांमधून बोलले जात आहे.

## कर्जतमध्ये साडी महोत्सव मेळावा



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मध्ये पहिल्यांदाच बनारसी साडी ड्रेस आणि दुपट्टे यांचा सुंदर साडी महोत्सव मेळावा आयोजित करण्यात आले होता.

जी. आर. सोनी व वनिता सोनी यांनी कर्जत शनि मंदिराच्या रविकिरण सभागृहांमध्ये साडी महोत्सव मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन कर्जत नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी कर्जत पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक सुवर्णा पत्की, शिव–सेना उपशहर संघटक शिल्पा दगडे, सानिया चौगुले, वनिता सोनी, पद्मा सोनी, जसोदा सोनी, कविता सोनी, सारिका सोनी, मंगला राठी, मिना प्रभावळकर, लक्ष्मीकांत सोनी आदी उपस्थित होते. या मेळाव्यात पहिल्यांदा बनारसी साडी, ड्रेस आणि दुपट्टे यांचा मेळावा सोबत खवय्यांसाठी स्टॉल ठेवण्यात आले होते.

## सुधागड तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातर्फे शरद पवार यांच्या घरावरील भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या मुंबई येथील निवासस्थानी अज्ञात जमावाकडून हल्ला झाला. या भ्याड हल्ल्याचा सुधागड राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी तर्फे शनिवारी (ता.९) जाहीर निषेध करण्यात आला. तसेच हल्लेखोरांवर योग्य कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे. या संबंधित निवेदन सुधागड पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांना देण्यात आले.



यावेळी पाली नगराध्यक्ष गीता पालरेचा यांनी सांगितले की महाराष्ट्राच्या राजकारणात आतापर्यंत कोणत्याही पक्षाच्या अध्यक्षांच्या घरावर अशा प्रकारचा भ्याड हल्ला झालेला नाही. शरद पवार यांनी सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकरी, महिला व ज्येष्ठ यांच्यासाठी तसेच समाजाच्या उन्नतीसाठी पाच दशकांहून जास्त वर्षे समर्पित केली आहे. अशा महान वयोवृद्ध नेत्यावर झालेल्या हल्ल्याचा सुधागड राष्ट्रवादी कॉँग्रेसतर्फे जाहीर निषेध करण्यात आला आहे. तर सुधागड तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष अभिजीत चांदोरकर यांनी देखील शरद पवार यांच्या हल्ल्याचा निषेध करत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी पाली तहसील कार्यालय बाहेर शरद पवार यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. यावेळी सुधागड तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस अध्यक्ष रमेश साळुंखे, पाली नगराध्यक्ष गीता पालरेचा, ग. रा. म्हात्रे, पाली शहर अध्यक्ष अभिजीत चांदोरकर, सुधागड तालुका राष्ट्रवादी युवक कॉँग्रेस अध्यक्ष संदेश शेवाळे, साक्षी दिघे, रूपाली भणगे, प्रकाश कारखानीस, साधुराम साजेकर, सुलतान बेनसेकर, सुधाकर मोरे, आशिक मणियार, सुधीर भालेराव, सुशील शिंदे, किरण खंडागळे, सचिन मोरे, इम्तियाज पठाण, कमलाकर शिंदे, पप्पू परबलकर, इसाक पानसरे, किरण चव्हाण, डॉ. जयंत जाधव, डी. सी.चव्हाण, सुनिल राऊत, रुचिता बेलोसे, रचना जाधव व सूरज मेंडन आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शरद पवार यांच्या मुंबईतील घरावर झालेल्या हल्ल्याचा मुरुड राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातर्फे जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या बंगल्यावर संतप्त एस टी कर्मचाऱ्यांच्या जमावाने अच–ानक केलेल्या हल्ल्याचा मुरुड तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातर्फे जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

एस टी महामंडळाचे राज्य शासनात विलिनीकरण कराव.ही एस.टी.कर्मचा–यांची मागणी राज्य सरकारने अमान्य केल्याने आक्रमक झालेल्या एस टी कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी थेट राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या बंगल्यावर धडक दिली.यावेळी संपकरी कर्मचाऱ्यांनी शरद पवार यांच्या विरोधात आक्रमक घोषणाबाजी केली, दगडफेक आणि चपलाही फेकल्या. याचा मुरुड मध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातर्फे जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे मंगेश दांडेकर, विजय पैर, हसमुख जैन, नितिन पवार, बाबा दांडेकर, जमीर बकवाल, इम्तियाज मलबारी, योगेंद्र गोयजी, मनीष माळी, ॲड.मृणाल खोत, प्रमिला माळी, यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## खांदेश्वर पोलिस ठरले महिलेसाठी देवदूत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जखमी महिलेसह तिच्या सहा वर्षीय मुलीला मदतीचा हात देऊन सदर महिलेवर दवा–उपचार केले तसेच सहा वर्षीय मुलीला निवारा मिळवून दिल्याने या दोघांसाठी खांदेश्वर पोलिस हे देवदूत ठरलेत.

दिनांक २० मार्च २०२२ रोजी साई प्रसाद हॉटेल च्या बाजूस सेक्टर ८, खांदा कॉलनी येथील बस स्टॉप चे बाजूला एक महिला जखमी अवस्थेत व तिच्यासोबत एक साधारण ०६ वर्षाची मुलगी दिसून आली. त्याबाबत त्या महिलेकडे पोलीस हवालदार भाऊसाहेब मोरे यांनी विचारपूस करता त्यांचे पती सुजीत कुमार यांचा मृत्यू झालेला असून त्या मूळच्या नारंग फेटा, लकडी पूर, मुसा फेटा, हैदराबाद राज्य– आंध्रप्रदेश येथील रहिवासी असल्याचे सांगितले. पनवेल परिसरामध्ये त्यांचे निश्चित असे राहण्याचे ठिकाण नाही. तसेच त्या पाय घसरून पडलेल्या असून त्यामुळे त्यांना चालता येत नसल्याचे व त्यांना उपचारांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. सदर महिला नामे ज्योति सजीत कुमार के, वय ३० वर्ष यांना उपचारार्थ एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल केले. त्यांचे पायाचे हाड मोडले असल्याचे निदान झाले. त्यांना झालेल्या नमूद दुखापतीवर खांदेश्वर पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांच्याकडून किरकोळ वर्गणी जमा करून ऑपरेशन करून व पायामध्ये रॅाड टाकून इलाज केला व त्यानंतर तिला आज डिस्चार्ज दिल्याने विश्रांतीसाठी रियल मेरी होम आश्रम, खैरवाडी, मोरबे या ठिकाणी त्यांना ठेवण्यात आले आहे. तसेच त्यांची मुलगी दृष्टी वय ०६ वर्षे हिला कमल अर्णव चारीटेबल ट्रस्ट, नवीन पनवेल या ठिकाणी सुरक्षिततेसाठी ठेवण्यात आलेले आहे.

सदरचे कामी वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुभाष कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भाऊसाहेब मोरे, पो. कॉ. गीते व पो. कॉ. राजेश पालवे यांनी सदर महिलेस मानवतेच्या दृष्टिकोनातून मदत करून सामाजिक दायित्व निभावल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शिरीष घरत यांच्या मध्यस्थीने कळंबोलीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळाला दिलासा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली गावातील प्रकल्पग्रस्तांची नैसर्गिक गरजेपोटी बांधलेली बांधकामे तोडण्याचा निर्णय सिडकोने घेतला होता. त्याची जय्यत तयारीही करण्यात आली होती पण शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शिंदे यांच्या दालनात कळंबोली प्रकल्पग्रस्तांची बैठक घेऊन घरांवरील तोड कारवाईला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे घरत यांचे प्रकल्पग्रस्तांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

महाविकास आघाडी सरकारने नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना २५० मिटर गावठाणातील बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला असून त्याला मान्यता दिली आहे आणि त्याचा जीआर काढण्यात आला आहे. असा निर्णय असतानाही सिडकोने कळंबोली गावातील प्रकल्पग्रस्तांची बांधकामे जमीनदोस्त करण्याचा निर्णय घेऊन त्याची तयारीही केली होती. याबाबत कळंबोली प्रकल्पग्रस्तांनी रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भेट घेवून शासनाने २५० मीटर गावठाणातील बांधकामांना मान्यता दिली असताना सिडको अशी कारवाई कशी करू शकतो ती थांबविण्यात यावी अशी विनंती घरत यांच्याकडे केली होती. याबाबत शिरीष घरत यांनी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शिंदे यांची तातडीने भेट घेवून त्यांना महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांची २५० मिटर गावठाणातील बांधकामे नियमित करण्यासाठी शास–नाने निर्णय घेऊन मान्यता दिली आहे, हे लक्षात आणून दिले आहे. या बाबत सहव्यवस्थापकीय संचालक शिंदे यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, उपाध्यक्ष मुखर्जी यांच्या बरोबर बोलणी करून सिडकोची कळंबोलीतील असलेल्या तोडक कारवाईला स्थगिती दिली आहे. जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या प्रयत्नाने कळंबोली गावातील प्रकल्पग्रस्तच्या गावठाणातील जागेवर नैसर्गिक गरजेपोटी बांधलेल्या घरांवर करण्यात येणाऱ्या कारवाईला स्थगिती देण्यात आली आहे त्यामुळे कळंबोली प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी शिरीष घरत यांचे आभार मानले. यावेळी तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आत्माराम गावंड, नगरसेवक रविशेठ भगत, मुन्ना शेठ भगत, सामाजिक कार्यकर्ते मायाशेठ भगत, कृष्णा भगत यांच्यासह अनेक कळंबोली गावातील प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.